# स्मार्ट नाशिक सिटी

नाशिक महानगरपालिका खाजगी प्रकाशन

नाशिक वर्ष १, अंक २ मासिक वृत्तपत्रिका एप्रिल २०१७


# महाराष्ट्र स्थापनेच्या वर्धापन दिनी मनपात ध्वजारोहण

**नाशिक** : महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ५७ व्या वर्धापन दिनी नाशिक महानगरपालिकेच्या वतीने राजीव गांधी भवन, मनपा मुख्यालय येथे महापौर रंजना भानसी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी आयुक्त राधाकृष्णन बी, उपमहापौर प्रथमेश गिते, स्थायी समिती सभापती शिवाजी गांगुर्डे, अतिरिक्त आयुक्त किशोर बोर्डे, नगरसेवक जगदीश पाटील, नगरसेविका माधुरी बोलकर, शाहीन मिर्झा, सरिता सोनवणे, नंदिनी बोडके, पल्लवी पाटील, हिमगौरी आहेर, आशा तडवी, प्रियंका घाटे, उपायुक्त विजय पगार, हरिभाऊ फडोळ, रोहिदास दोरकुळकर, शहर अभियंता यु. बी. पवार, मुख्यलेखापरिक्षक महेश बच्छाव, अग्निशमन अधिकारी अनिल महाजन, कार्यकारी अभियंता शरद बनकर तसेच विभागीय अधिकारी सहाय्यक आयुक्त आदींसह अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

या सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत नाशिक महानगरपालिकेतील कायम सेवेत असलेले विविध संवर्गातील २३ अधिकारी-कर्मचारी यांना माहे ऑक्टोबर ते डिसेंबर,२०१६ करिता निवड करण्यात आलेल्या उत्कृष्ट अधिकारी-कर्मचारी



यात श्रीमती मालिनी अशोक शिरसाठ (अधिक्षक - मु.नि.क.सं विभाग), एन.एस. गुरव (वरिष्ठ लिपीक - विभागीय कार्यालय, सातपूर), एन.एस.पंडीत (कनिष्ठ लिपीक - संगणक विभाग), सुनिल.डी. नागपुरे (दुसरी-नाईक, नोंदणी बटवडा विभाग), संजय कृष्णाजी बोरसे (शिपाई - विभागीय कार्यालय पंचवटी), संजय विठ्ठल दराडे (स्वच्छता निरीक्षक - आरोग्य विभाग), सलीम मोहमंद शेख (आरोग्य), सुरेश काशिनाथ आव्हाड (सफाई कामगार - विभागीय कार्यालय पंचवटी), रामनारायण माखनलाल करोतिया (सफाई कामगार - विभागीय कार्यालय नाशिकरोड), एस.आर.डांबरे (बिगारी - अतिक्रमण विभाग), डॉ. विनोद पावसकर (वैद्यकिय अधिकारी - वैद्यकिय विभाग), पुजा प्रविण बोराडे (इनचार्ज सिस्टर - वैद्यकिय विभाग), सुधाकर संपत धुळे (वॉर्डबॉय - वैद्यकिय विभाग), गोकुळ पुंडलीक पगारे (शाखा अभियंता - नगररचना विभाग), विलास सावळीराम गावले (मिस्तरी - सार्वजनिक बांधकाम विभाग), कैलास शंकर ननावरे (वायरमन - विद्युत विभाग, नाशिक पुर्व), बाळु रंगनाथ पांगारकर (मदतनीस - विद्युत, मुख्यालय), सोपान महादु गांगुर्डे (पाईपलाईन फिटर - वि.का. नाशिक पूर्व), विजय दत्तात्रय झनकर (प्लंबर - वि.कार्या. नविन नाशिक), अजय बबनराव वाघ (ॲटो इलेक्ट्रीशियन - मोटार दुरुस्ती विभाग), एकनाथ धोंडू पिंपळके (माळी - विभागीय कार्यालय सातपूर), जगदिश सावळेराम



देशमुख (फायरमन - अग्निशमन), निवृत्ती गंगाधर थोरात (वाहनचालक - अग्निशमन), आदींचा यात समावेश होता. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन गोपिनाथ हिवाळे यांनी केले. दि १ मे २०१७ कामगारदिनी उत्कृष्ट कार्याबद्दल स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र वितरण करून मान्यवरांचे व सत्कारार्थीचे आभार मानुन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# महापालिकेच्या नागरी सुविधा केंद्राचा शुभारंभ

**महापौरांच्या हस्ते उद्घाटन; पहिल्या टप्प्यात १६ सेवांचा समावेश; ४५ सुविधा पुरविणार**

**नाशिक** : नागरिकांना एकाच छताखाली सर्व प्रकारच्या सेवा पुरविण्यास तसेच विविध कर भरण्यास आणि अन्य महत्त्वाच्या कामांसाठी सहज सेवा उपलब्ध व्हावी यासाठी महापालिकेने एकुण ४५ सेवा नागरी सेवा केंद्राच्या माध्यमांतून पुरविल्या जाणार असून, पहिल्या टप्प्यात १६ सेवा सुरू करण्यात आल्या आहेत. या नागरी सेवा आणि सुविधा केंद्राचे उद्घाटन महापौर रंजना भानसी यांच्या हस्ते करण्यात आले.

या शुभारंभाप्रसंगी उपमहापौर प्रथमेश गिते, आयुक्त अभिषेक कृष्णा, विरोधी पक्षनेते अजय बोरस्ते, गटनेते संभाजी मोरुस्कर, शाहू खैरे, सलीम शेख, गजानन शेलार, नगरसेवक मुकेश शहाणे, समीर कांबळे यांच्यासह विविध पदाधिकारी, अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. महापालिकेने



विविध करभरणासाठी शहरात ठिक-ठिकाणी केंद्र सुरू केली आहेत. परंतु, जन्म-मृत्यूचे दाखले, विविध परवानग्या अशा प्रकारची प्रमाणपत्रे पालिकेकडून दिली जातात. त्यासाठी नागरिकांना विभागीय कार्यालयासह मुख्यालयात चकरा माराव्या लागतात.

त्यामुळे महापालिकेने पिंपरी-चिंचवडच्या धर्तीवर प्रथम टप्प्यात नागरी सुविधा केंद्र कार्यान्वित होणार आहेत. त्यातील राजीव गांधी भवनासह विभागीय कार्यालयांतील नागरी सुविधा केंद्र कार्यान्वित केले.

या नागरी सुविधा केंद्रात पालिकेमार्फत मनपामार्फत जवळपास १६ सेवा पुरविण्यात येणार असून, यामध्ये महापालिकेला येस बँकेचे सहकार्य लाभले आहे. येस बँकेने नागरी सुविधा केंद्र चालविणेकामी विनामूल्य मनुष्यबळ उपलब्ध करून दिले आहे.

नागरी सुविधा केंद्रामध्ये येस बँकेमार्फत कॅशलेस व्यवहारांना प्रोत्साहन दिले जाणार आहे. त्यासाठी बँकेमार्फत डेबिट-क्रेडिट कार्डद्वारे करभरणासाठी प्रत्येक केंद्रात पीओएस मशिन उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

# महात्मा बसवेश्वर जयंती कार्यक्रम




**नाशिक** : नाशिक महानगरपालिकेच्या वतीने महात्मा बसवेश्वर जयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

मनपा मुख्यालय राजीव गांधी भवन येथे महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेस महापौर रंजना भानसी यांचे हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.

या कार्यक्रमास उपमहापौर प्रथमेश गिते, स्थायी समिती सभापती शिवाजी गांगुर्डे, उपायुक्त रोहिदास दोरकुळकर, विरोधी पक्ष नेते अजय बोरस्ते, गटनेते संभाजी मोरूस्कर, शाहु खैरे, गजानन शेलार, नगर सेवक अरुण पवार, नगरसेविका वत्सला खैरे तसेच समाजाचे गणेश भोरे, शामराव झारेकर, अनिल कोठुळे, अरुण आवटे, रमेश बडदाळे, उमाकांत उदार, सिद्धेश्वर दंदणे, साधना दिवटे, लतिका साखरे, सोनिया जंगम, मंदा जंगम, सुशीला आंधळकर, प्रगती भोरे, अरुणा भोरे, संगीता हिंगमीरे, शैला तोडकर, हिराबाई साखरे, जनसंपर्क अधिकारी यशवंत ओगले, हिरामण जगझाप, बाळासाहेब शिंदे, नितीन गंभीरे, गोपीनाथ हिवाळे, हुसेन मो पठाण, संतोष कान्हे, विरसिंग कामे आदिसह अधिकारी कर्मचारी उपस्थिती होते.

### महापौर भानसी यांच्या हस्ते उद्घाटन आणि प्रायोगिक तत्त्वावर ६ सायकली उपलब्ध

# हुतात्मा अनंत कान्हेरे मैदानावर ‘सायकल शेअरींगचा शुभारंभ’

**नाशिक :** शहरातील हवा प्रदुषण, व्यायामासाठी सायकलचा वापर करण्यासाठी तसेच रोजच्या दैनंदिन जीवनात इच्छित स्थळी जाण्यासाठी जास्तीत जास्त सायकलचा वापर व्हावा. यासाठी महापालिका आणि टिसीएसच्या डिजीटल इम्पॅक्ट स्केवअर तसेच नाशिक सायकलिस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या ‘सायकल शेअरिंग’ उपक्रमाचे उद्घाटन महापौर रंजना भानसी यांच्या हस्ते झाले.

हुतात्मा अनंत कान्हेरे मैदानावर उभारण्यात आलेल्या प्रथम केंद्रात प्रायोगिक तत्त्वावर हा प्रकल्प महापालिकेकडून राबविण्यात आला. स्मार्टसिटी प्रकल्पांतर्गत स्वतंत्र सायकल ट्रॅकची महापालिकेकडून निर्मिती करण्यात आली. चेन्नई विद्यापीठाच्या संशोधक टीमने ही संपूर्ण स्वयंचलित यंत्रणा उभारण्याचा प्रयत्न केला आहे. सायकलचा वापर करून सायकल लॉक करून ठेवण्याची सुविधा आहे. नाममात्र दरात सायकल उपलब्ध असल्याचे टिसीएसच्या डिजिटल इम्पॅक्ट एसक्युच्या सामाजिक उपक्रमांचे प्रमुख संदिप शिंदे यांनी ही माहिती दिली. यावेळी नगरसेविका हेमलता पाटील, महापालिकेचे



शहर अभियंता यु.बी. पवार, सायकलिस्ट फाऊंडेशनचे अध्यक्ष जसपाल सिंग बिर्दी, किरण चव्हाण आदी उपस्थित होते.

यावेळी महापौर भानसी म्हणाल्या की, नाशिक महानगरपालिका असे प्रकल्प राबविण्यासाठी उत्सुक असून, विविध ठिकाणी या उपक्रमासाठी जागा उपलब्ध करून देण्यात येईल. स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत स्वतंत्र सायकल ट्रॅकची निर्मिती करण्यास महानगरपालिका सकारात्मक आहे. प्रथम प्रयोगात हा उपक्रम यशस्वी झाल्यास पेडल टीम आणि नाशिक सायकलिस्ट यांनी केलेल्या विविध सर्व्हेचा



अभ्यास करून शहरातील इतर भागातही याचे प्रयोजन करण्यात येणार असल्याचे महापौर रंजना भानसी यांनी सांगितले.

# राष्ट्रीय अग्निशमन दिनानिमित्त शहरात अग्निशमन दलाची प्रात्यक्षिके







**नाशिक :** १४ एप्रिल हा राष्ट्रीय अग्निशमन दिन म्हणून साजरा केला जातो. त्या निमित्त मनपाच्या वतीने शहरातील विविध भागात अग्निशमन दलाने प्रात्यक्षिके सादर केले. यामाध्यमातून जनजागृतीपर माहिती देण्यात आली.

अग्निशमन केंद्राअंतर्गत केंब्रिज स्कुलला धुराच्या खोलीतून बीए सेटचा वापर करून मुलींना बाहेर सुरक्षित स्थळी हलविण्यात आले. तसेच दोन हेल्मेट मेथडचा वापर करून जखमींना रूग्णवाहिकामध्ये हलविण्यात आले. दुसऱ्या मजल्यावर अडकलेल्या व्यक्तींना लँडरच्या सहाय्याने खाली आणले व घराला लागलेली आग विझवण्याचे प्रात्यक्षिके दाखविण्यात आले. आग लागल्यानंतर अग्निशमन दलाचा बंब येत्या दरम्यान आपण काय करावे याबाबत प्रबोधन करण्यात आले. तसेच ब्रॅंलचे प्रकार दाखविण्यात आले. सातपूर, पंचवटी, सिडको येथील विद्यालय तसेच महाविद्यालयात फायर ड्रिल, रेस्क्यु ड्रील, फोम ड्रिल, मेया बाऊजरच्या सहाय्याने आगीवर पाणी मारणे, बीए सेट आणि दोन हेल्मेट मेथडचा वापर तसेच अग्निरोधक वापरणे, इ. ची प्रात्यक्षिके देण्यात आली. शासनाकडून प्राप्त झालेले पोस्टर्स शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी लावण्यात आले.

# राज्यमंत्रिपदाचा दर्जा महापौरांना हवा

## सफाई कर्मचाऱ्यांसाठी महापौर परिषदेत रेटा

**नाशिक :** महापौरांना जिल्हा परिषद अध्यक्षांच्या आधारावर महापालिका राज्यमंत्री पदाचा दर्जा मिळावा अशी मागणी महापौर रंजना भानसी यांनी अखिल भारतीय महापार परिषद मध्यप्रदेशमधील ग्वाल्हेर येथे मांडली.

शहरातील स्वच्छतेकरिता अपूर्ण सफाई कामगारांकडून सुरू असलेले कामाचा उल्लेख करत सफाई कामगारांची महापालिकेत नवीन भरती करावी अशी मागणी केली. ४८ व्या अखिल भारतीय महापरिषदेचे उद्घाटन मध्यप्रदेशाच्या ग्वाल्हेर येथे नुकतेच देशभरातील महापालिकांची परिषद पार पडली. या महापौर परिषद उद्घाटनप्रसंगी मध्यप्रदेशाच्या नगरविकास मंत्री माया सिंह यांच्या हस्ते पार पडले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार नारायणसिंह कुशावह, अनिल सोले यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. तसेच या दोन दिवसीय महापौर परिषदेचे अध्यक्ष विनोद चमौली, महापौर परिषदेचे महामंत्री उमाशंकर गुप्ता, परिषदेचे सरचिटणीस अरोरा उपस्थित होते. या परिषदेला देशातील ५९ महापौरांनी हजेरी लावली. या परिषदेत नाशिकच्या महापौर रंजना भानसी यांनी आपल्या भाषणात नाशिक मधील सुरू असलेल्या स्वच्छ भारत अभियानाच्या कामाची माहिती व अभियानाचे प्रमुख उद्दीष्ट्ये सांगितले. नाशिक महापालिकेच्या सध्या अपुऱ्या सफाई कर्मचाऱ्यांशी संख्येचा




उल्लेख करून सफाई कर्मचारी भरती शासनाकडून मान्यता मिळावी. महापालिकेत केवळ १९९३ सफाई कर्मचारी कार्यरत असून लोकसंख्ये नुसार ४५०० सफाई कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे.

स्वच्छता अभियान आणि हगणदारी मुक्त नाशिक करण्यासाठी केंद्र शासनाच्या अभियानातून ६५४६ लाभार्थ्यांना वैयक्तिक शौचालय उपलब्ध करून दिले. तसेच १२५ कुटुंबासाठी सामुहिक शौचालय उभारण्यात आली. तसेच सार्वजनिक ठिकाणी शौचालय उभारून स्वच्छता व हगणदारी मुक्त जन जागृती मोहिम राबविण्यात येत आहे. अशा सुचना महापौर रंजना भानसी यांनी केल्या.

# 'रामायण' निवासस्थानी महापौरांचा प्रवेश सोहळा

**नाशिक :** महापालिकेच्या रामायण बंगल्यावर आणि महापौरपदांची सुत्रे हाती घेतल्यानंतर रंजना भानसी यांनी महापौर निवासस्थानी विधिवत पुजा करून प्रवेश केला.

महापौर पदाच्या निवडणुकीत ज्येष्ठ नगरसेविका रंजना भानसी यांची बिनविरोध निवड झाली. त्यानंतर पाच-सहा दिवसांनी राजीव गांधी भवनामधील महापौरांच्या दालनात विधीवत पुजा करून प्रवेश सोहळा केला.

महापौरांसाठी असलेला रामायण बंगला निवासस्थानी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते रमेश गायधनी यांच्या हस्ते फित कापून महापौर बंगल्यात रंजना भानसी यांनी प्रवेश केला. यावेळी आमदार बाळासाहेब सानप, उपमहापौर प्रथमेश गिते यांच्यासह नगरसेवक आणि नगरसेविका तसेच इतर पदाधिकारी उपस्थित होते. या वेळी त्यांना नगरसेवक पदाधिकारी व शहरातील नागरिकांनी भेटून सदिच्छा दिल्या.



## मनपा घरकुल योजनेची सोडत





**नाशिक :** नाशिक महानगरपालिका झोपडपट्टी सुधारणा विभागा अंतर्गत राजीवगांधी भवन येथे गोदावरी नगर पंचवटी येथील एकूण १३२ लाभार्थ्यांना चुंचाळे येथील घरकुल योजनेची सोडत करण्यात आली. या घरकुल योजनेची सोडत काढणे यावेळी स्लम अधिकारी यशवंत ओगले, सत्र अधिकारी, संजय उन्हवणे, जोशी, योजनातज्ञ व मनपा कर्मचारी हिंगमिरे, बच्छाव, जाधव, दर्वे, राऊत गोवर्धनी, गोडसे इ. अधिकारी कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

## 'मेक इन नाशिक'मध्ये उद्योगांना निमंत्रणे

**नाशिक :** नाशिकमधील मोठ्या औद्योगिकसमुहांनी गुंतवणूक करण्याच्या हेतुने निमा तर्फे मुंबईत भरविल्या जाणाऱ्या ''मेक इन नाशिक'' उपक्रमासंदर्भात मंत्रालयात उद्योगमंत्री सुभाष देसाई व जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन यांच्याबरोबर बैठक झाली.

या वेळी ब्रिटानिया, जिंदाल, इ. सारख्या मोठ्या उद्योजकांना निमंत्रित केले तसेच शासनातर्फे स्वतंत्र दालन दालन उपलब्ध करून देण्यात येईल. बैठकीला महापौर रंजना भानसी, उपमहापौर प्रथमेश गिते, आमदार बाळासाहेब सानप, देवयांनी फरांदे, हेमंत टकले, शिवाजी गांगुर्डे, एमआयडीच्या प्रादेशिक अधिकारी हेमांगी पाटील, निमाचे अध्यक्ष हरीष शंकर बॅनर्जी, उपाध्यक्ष मंगेश पाटणकर, मानद सरचिटणीस उदय खरोटे, अतिरिक्त उपाध्यक्ष आशिष नहार, सचिव ज्ञानेश्वर गोपाळे, नितीन वागसकर, प्रदीप पेशकार, सुरेश माळी आदी उपस्थित होते.



# सुरक्षा रक्षकांची गस्ती; गोदा परिसरातील कारवाईचा नागरिकांना धसका

**नाशिक :** महापालिकेच्या गोदावरी कक्षा मार्फत गोदावरी नदीपात्रातील प्रदुषण रोखण्यासाठी महापालिकेने पहिल्या टप्प्यात रामकुंड परिसरात सुरूवात केली. या दंडात्मक कारवाईचा धसका नागरिकांनी घेतला असून गोदापात्रात कपडे - वाहने धुणाऱ्या, घाण-कचरा टाकणाऱ्या दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे.

महापालिकेच्या गोदावरी संवर्धन कक्षामार्फत सुमारे ४० सुरक्षा रक्षकांची गस्त तीन सत्रात सुरू ठेवण्यात आली होती. त्यामुळे नागरिकांनी घाण-कचरा, निर्माल्य, कपडे, वाहने धुण्याचे धाडस कोणीही केले नाही. ज्या ठिकाणी घाण-कचरा, निर्माल्य, कपडे-वाहने धुण्याचे आढळून आल्यास तेथील सुरक्षा रक्षकांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येणार असल्याची माहिती उपआयुक्त दोरकुळकर यांनी दिली. त्यामुळे सुरक्षा रक्षक पहारा देत आहे. गोदावरी कक्षाचे मुख्यालय पंचवटीतील विभागीय कार्यालय या ठिकाणी करण्यात येणार आहे. रामकुंडालगत असलेल्या वस्त्रांतरगृहातही एक उपकार्यालय असणार आहे.









# ई तंत्राने मुख्यमंत्र्यांकडून ‘अमृत’ भूमिपूजन प्रकल्पाचा समारंभ

## अमृत योजना : मुख्यमंत्र्यांनी प्रकल्प वेळेत पूर्ण करण्याचे दिले आदेश

**नाशिक** : सुंदर, स्वच्छ शहरांची निर्मिती करण्यास विविध कामांचे उद्घाटनासाठी होणारा खर्च, वेळेचा अपव्य टाळण्यासाठी अशा विविध कारणांच्या पार्श्वभूमीवर ई तंत्राचा वापर करून अमृत योजनेतून २० शहरांमध्ये १६२२ कोटी रूपयांचे प्रकल्प करण्यात आले. विकास कामांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस इ भूमिपुजनाद्वारे समारंभ करण्यात आले. नाशिकच्या गंगापूर येथील मलनिस्सारण केंद्रासाठी २८ कोटींच्या निधीसह २८ प्रकल्पाचे यात ई भूमिपूजन करण्यात आले. या कामांना निधीचा पुरवठा करून कामे वेळेत पूर्ण न झाल्यास तसेच कामात गुणवत्तेचा अभाव आढळल्यास कारवाई करण्याचा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांनी दिला.

या ई भुमिपूजनाचे वेबकास्टिंग महाकवि कालिदास कलामंदिर येथे महापालिकेच्या वतीने विशेष व्यवस्था करण्यात आली होती. केंद्र सरकारच्या स्मार्ट सिटी, अमृत व नगरोत्थान या योजनांतर्गत मलनिस्सारण, पाणीपुरवठा स्वच्छतेसाठी विविध विकास कामे केली जाणार असून पायाभूत शाश्वत विकासावर भर दिला जाईल असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. तसेच सर्व शासकीय सेवांचे लवकरात लवकर ई पोर्टल उभारण्यात येईल असे सांगितले.

यावेळी आमदार बाळासाहेब सानप, सीमा हिरे, देवयानी फरांदे, महापौर रंजना भानसी, उपमहापौर प्रथमेश गिते, जिल्हाधिकारी व महापालिकेचे प्रभारी आयुक्त राधाकृष्णन बी. स्थायी समिती सभापति शिवाजी गांगुर्डे यांच्यासह पदाधिकारी, नगरसेवक-नगरसेविका तसेच आदी मान्यवर उपस्थित होते.






# मनपाची कनेक्टीव्हीटी ऑप्टीकल केबलने होणार स्मार्ट

**नाशिक** : महापालिकेने सिसिटीव्ही आणि ऑनलाइन सेवांसाठी लागणारे नेटवर्क खासगी कंपन्यांवर अवलंबून रहाण्याऐवजी महानगरपालिकेने शहरामध्ये स्वतःचे आपले ऑप्टीकल केबल नेटवर्क उभारावे अशी सुचना शासनाच्या माहिती आणि तंत्रज्ञान विभागाचे सचिव विजय गौतम यांनी आयुक्त अभिषेक कृष्णा यांच्या समवेत झालेल्या बैठकीत दिली. स्मार्ट सिटी योजनेंतर्गत ही सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असून त्यासाठी शासन ऑप्टिकल केबलचा पुरवठा करणार आहे. या सुविधेमुळे महापालिकेचे कामकाज अधिक गतिमान होईल.



पंतप्रधानांची स्मार्ट सिटी योजनाही भाजपाच्या सत्ताकाळात राबविण्यात येणार आहे. लोकशाहीमध्ये लोकसहभाग हा केवळ मतदानापुरता मर्यादित न राहता प्रत्येक निर्णय प्रक्रियेत नागरिकांचा सहभाग असणे आवश्यक आहे. स्मार्ट सिटीच्या संकल्पनेतही याच बाबींवर भर देण्यात आला आहे. त्यासाठीचे निकषही केंद्रीय नगरविकास विभागाने ठरवून दिले आहेत. यातील काही निकषांची महापालिकेने यापूर्वीच पूर्तता केली होती. तर काही बाबतीत सुधारणा करण्यात येणार आहे. ऑनलाईन प्रणाली व सीसीटीव्हीची यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी सर्वात महत्वाची असते ती नेटवर्क प्रणाली. ही प्रणाली खासगी कंपन्यांकडून घेताना खर्च तर अधिक होतोच; शिवाय या कंपन्यांवर अवलंबूनही रहावे लागते. या पार्श्वभूमीवर शासनाने महापालिकेला ऑप्टिकल फायबर पुरविल्यास कनेक्टिव्हिटीसाठी अधिक सुकर होईल, अशी सूचना शासनाच्या माहिती आणि तंत्रज्ञान खात्याचे मुख्य सचिव विजय गौतम यांनी स्मार्ट सिटी संदर्भात झालेल्या बैठकीत व्यक्त केली. बैठकीला शहर अभियंता यू. बी. पवार, स्मार्ट सिटी मुख्यकार्यकारी अधिकारी (प्र) विजय पगारे, संगणक विभाग प्रमुख पी. बी. मगर, अधीक्षक अभियंता शिवाजी चव्हाणके आदी उपस्थित होते.

# महापालिकेचे अर्थसंकल्प अंदाजपत्रक स्थायीला सादर




**नाशिक** : १ जुलैपासून देशभरात जीएसटी लागू होणार असल्याच्या पार्श्वभुमिवर नाशिक महापालिकेचे सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे आयुक्तांनी तयार केलेले प्रारूप अर्थसंकल्प अंदाजपत्रक स्थायी समितीला सादर करण्यात आले. आयुक्त पदाचा प्रभारी कार्यभार असलेले जिल्हाधिकारी राधाकृष्ण बी. यांच्या मार्फत हे अंदाजपत्रक स्थायी समितीला देण्यात आले.

महापालिकेचे अंदाजपत्रक १४०४ कोटींचे स्थायी समितीचे सभापति शिवाजी गांगुर्डे यांना सादर करतांना प्रभारी आयुक्त तथा जिल्हाधिकारी राधाकृष्णन बी. समवेत स्थायी समितीचे सदस्य वत्सला खैरे, सीमा ताजणे, सुनिता पिंगळे, जगदीश पाटील, अलका आहिरे, राजेंद्र महाले, प्रविण तिदमे, दत्तात्रय सूर्यवंशी, भागवत आरोटे, मुकेश शहाणे, मुशीर सय्यद, मुख्य लेखाधिकारी सुभाष भोर, अतिरिक्त आयुक्त किशोर बोर्डे अधिकारी कर्मचारी वर्ग इ. उपस्थित होते.



मनपाच्या स्थायी समिती सभापती पदी शिवाजी गांगुर्डे यांची निवड झाल्यानंतर त्यांचा सत्कार करतांना महापौर रंजना भानसी, आमदार बाळासाहेब सानप, उपमहापौर प्रथमेश गिते तसेच नगरसेवक व पदाधिकारी.

स्मार्ट नाशिक सिटी
नाशिक महानगरपालिका खाजगी प्रकाशन
संपादित व प्रकाशित : अभिषेक कृष्णा आयुक्त, अतिरिक्त आयुक्त किशोर बोर्डे, उपायुक्त हरिभाऊ फडोळ
संपादकीय समन्वयक : चेतन श्रीराम घरटे (ग्लोबल सेलोरा सिस्टम)